# २७) ज्ञानेश्वरीतील व्यक्तिरेखा : संजय आणि धृतराष्ट्र

ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे

**संजय**

**ते श्रीकृष्णवचनामृत।**
**पार्थी भरोनि असे वोसंडत।**
**मग व्यासकृपा प्राप्त। संजयासी।।५८९।।** अ. १५

भगवान श्रीकृष्णाचे वचनामृत अर्जुनाच्या ठिकाणी ओसंडून वाहत असताना, ते व्यासांच्या कृपेने संजयाला मिळाले, असे श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात. प्रतिपाद्य विषय 'संजय' हा आहे. व्यासांची प्रतिभा, धृतराष्ट्राचा मोह आणि संजयाची समरसता पाहण्यासारखी आहे. संजयाच्या ठिकाणी वर्णन करण्यासारखे काय आहे याचा विचार करत असताना संजयाने आपल्या स्वतःबद्दल म्हटले आहे की, युद्ध म्हणून रथांची गरज भासली, रथ म्हणून घोड्यांची गरज भासली आणि मला घोड्यांची पारख असून मला ते चालवता येतात. एवढ्यावरून मी या लोकांच्या जवळ आलो. नाहीतर यांचा माझा काय संबंध?

**आणि रथींचिये राहाटी। घेई जो घोडेयासाठी।**
**तया आम्हां या गोष्टी। गोचरा होती।।१५८१।।** अ. १८

धृतराष्ट्रासारख्या मोठ्या माणसाच्या रथाचे सारथ्य करण्याचा योग आला. असे म्हणतात की, धृतराष्ट्राचा आधीचा सारथी अधिरथ होता, मग हा संजय झाला. हा जवळचा असल्याने व्यासांनी त्याच्यावरच कृपा केली. घोड्यांची पारख असणारा आणि त्यांना खरारा करणारा,

रथ चालवणारा असा मी, पण श्रीव्यासांच्या कृपेमुळे मला हे युद्ध पाहता आले, त्यानिमित्ताने होणारा श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ऐकता आला आणि या संवादरूपी गंगेमध्ये मला स्नान करता आले, असा उल्लेख संजयाने ठिकठिकाणी केला आहे. संजय हा कुणाचा मुलगा आहे, असा प्रश्न अनेक वेळा विचारला जातो. तर गावाल्गण हे त्याच्या वडिलांचे नाव होते आणि सारथ्य करणे हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. तर असा हा सारथ्य करणारा संजय, एवढ्या मोठ्या भाग्याला पात्र झाला, ह्याचे वर्णन ज्ञानोबाराय ज्ञानेश्वरीमध्ये ठिकठिकाणी करतात. संजयासंबंधी कोणकोणत्या विशेषणांचा वापर ज्ञानोबारायांनी केला हे पाहू या. कधी ज्ञानोबारायांनी शोकाकुल अर्जुनाचे वर्णन करणारा संजय, देवांच्या वाक्याचे वर्णन करणारा संजय, त्या भगवद्गीतेच्या ज्ञानासंबंधी ओलावा असलेला संजय, धृतराष्ट्राबरोबर बोलताना मर्यादा ठेवून बोलणारा संजय, आणि सांगताना स्वतःची अवस्था चोरून न ठेवता सहजपणे प्रकट करणारा अवस्थायुक्त संजय, अवस्थेला पात्र झालेला संजय, एखादी विहीर भरून उतू जावी अशी अवस्था प्राप्त झालेला संजय. पुन्हा भगवद्गीता सांगायची आहे, म्हणून ज्याप्रमाणे एखाद्या शेताला पाणी दिल्यानंतर ती ओल कमी होण्याची, वाफसा प्राप्त होण्याची वाट ४-५ दिवस पाहावी लागते, त्याप्रमाणे संजयाच्या ठिकाणी भगवद्गीता श्रवणाची, आणि ती भगवद्गीता धृतराष्ट्राला सांगायची म्हणजेच, वाफसा होईपर्यंत किंवा वाफसा प्राप्त करून घेण्याकरता व्यासांच्या कृपेची वाट पाहणारा संजय, वाफसा प्राप्त करणारा संजय, आज्ञा प्रमाण मानणारा संजय, ज्याच्या ठिकाणी भरभरून सात्त्विकता निर्माण होते, असा सात्त्विक संजय, आपले वाक्य सांगताना ते आपल्या मालकाला आवडत नाही, असे वाटून दुःखी

होणारा संजय. ज्ञानोबारायांनी संजयाच्या स्वभावाचा कुठलाही पैलू टाळून त्याचा उपमर्द केलेला नाही. कुरुक्षेत्रावरच्या प्रत्येक योद्ध्याकडे संजयाने पाहिले असता त्यांच्या मनातले भाव, व्यासांच्या कृपेमुळे, संजय जाणत होता. एवढी व्यासांची त्याच्यावर कृपा होती. नुसते दिसत होते, आणि दिसते ते सांगायचे, एवढीच त्याच्यावर कृपा नव्हती. तर ज्या व्यक्ती दिसतात त्यांच्या मनातले भाव, विचार कळण्याची शक्ती व्यासांच्या कृपेमुळे संजयाला प्राप्त झाली होती. आणि म्हणून योद्ध्यांच्या मनातले, अर्जुनाच्या मनातले, संजयाला कळत होते आणि संजयाच्या मनातले ज्ञानोबारायांना कळत होते. कारण त्यासंबंधी ओव्या निर्माण झाल्या आहेत. त्यावरून ज्ञानोबारायांनी संजयाबद्दल बोलायचे बाकी काही सोडले नाही, असे – म्हणावे लागेल. ज्या वेळी संजय म्हणतो, 'धृतराष्ट्रा ऐक,' ही वाक्ये जी आहेत, –जी अक्षरे आहेत ती नुसती अक्षरे नाहीत, असा मला विश्वास वाटतो, **ती अक्षरे नव्हती देखा। ब्रह्म साम्राज्य दीपिका। अर्जुनालागी चित्कळिका। उजळविली श्रीकृष्णे।।**

ही नुसती अक्षरे नाहीत, असे संजय म्हणतो. केवढा विश्वास आहे संजयाचा. तसेच अर्जुनाच्या बाबतीत, 'माया आली आणि माया गेली,' हे सांगणारा संजय. ग्रंथकर्त्याला सगळ्या प्रकारच्या संगती ध्यानात घेऊन बोलावे लागते. ग्रंथ म्हटला की उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता असे विचार असतात. त्याला ग्रंथ म्हणतात. जसे 'माया आली' हे वर्णन पहिल्या अध्यायात आहे, तसे 'माया गेली' हे वर्णन अकराव्या आणि अठराव्या अध्यायात आहे. संजय म्हणतो, 'धृतराष्ट्र! ही आदिपुरुषाची माया आहे.'

**हे आदिपुरुषाची माया। ब्रह्मयाहि नयेचि आया।।**
**म्हणऊनी भुलविला ऐके राया। संजयो म्हणे।।२०३।।** अ. १

**तैसा अनुग्रहो पैं राया। श्रीहरी केला धनंजया।**
**आता कवणे कडेही माया। ऐसी भाष नेणोंचि तो।।१८५।।** अ. ११

एवढे मोठे विश्वरूप पाहिल्यानंतर मायेचा शब्दच कशाला काढायचा? जसा मोह आला गेला, तशी माया आली अणि गेली, असे संजय सांगतोय. संजयाच्या सर्व लक्षणांबरोबर अपमानित संजय, भक्तिकथेविषयी जिव्हाळा असलेला संजय, धृतराष्ट्रासंबंधी विस्मय होणारा संजय, विश्वरूप पाहून आपले आश्चर्य धृतराष्ट्राला सांगणारा संजय, धृतराष्ट्र जरी श्रीकृष्णार्जुनांच्या संवादाचे रसपान करायला तयार नसला, तरी आपला प्रयत्न न सोडणारा प्रयत्नवादी संजय, धृतराष्ट्र हा आपला दाता आहे, मालक आहे त्याला ही गीता ऐकल्यानंतर तरी आवड निर्माण होईल अशी आशा वाटणारा आशावादी संजय, अशी संजयाची विविध रूपे दर्शवून, संजय रेखाटताना ज्ञानोबाराय एके ठिकाणी म्हणतात की,

**तो धृतराष्ट्र राया। सूतसे पान करावया।**
**म्हणौनि जीवितांतु तया। नोहेचि भारी।।५८९।।** अ. १५

जसे आपल्याला वाटते की, सतत आग्रह करून अनेक प्रवचने ऐकून एखाद्याला परमार्थाची आवड निर्माण होईल, तसे धृतराष्ट्राबद्दल संजयाला वाटते. अर्जुन हा शत्रू नसून आपला गुरू आहे, असे धृतराष्ट्राला सांगणारा संजय, तो धृतराष्ट्राला सांगतो की, अहो महाराज, अर्जुनाचा तुम्ही का द्वेष करता? अर्जुन हा खरेच आपला गुरू आहे. कारण त्याने जर भगवान श्रीकृष्णाला असे ज्ञानासंबंधी प्रश्न विचारले नसते, तर श्रीकृष्णाच्या मुखातून प्रसवलेली गीता आपल्यापुढे आली असती का? यावर ज्ञानोबाराय म्हणतात,

**हा न पुसता हे गोठी। तरी देवो का सोडिते गांठी।।**
**तरी कैसेनि आम्हां भेटी। परमार्थेसीं!।।४२८।।** अ. १७

म्हणजे संजयाने देवाचे गाठोडे सोडले. ज्या गाठोड्याच्या गाठी भगवंतांनी कधी देवकी, वसुदेव, यशोदा यांच्याकरताही सोडल्या नव्हत्या, त्या अर्जुनासाठी अजून सोडल्या आणि त्या अर्जुनामुळे आपल्याला गीता प्राप्त झाली. अर्जुनाचे यात आपल्यावर किती उपकार आहेत. तेव्हा तुम्ही त्याचा द्वेष करू नका. धृतराष्ट्राच्या मनात पांडवांबद्दल अखेरपर्यंत द्वेषच होता हे त्याच्या चरित्रामध्ये एक प्रसंगात आपल्याला पाहायला मिळते.

संजयाचं वर्णन करताना त्याच्याबरोबर धृतराष्ट्र हा येणारच. तरी पण आपण संजयाचे गुण जास्तीत जास्त पाहू या.

सातव्या अध्यायामध्ये दोघांचा संवाद सांगत असताना संजय म्हणतो की,

**आता तयाचे ते प्रश्न करणें। वरी सर्वज्ञ श्रीहरीचें बोलणें।**
**हे संजयो आवडलेपणें। सांगैल कैसें।।२०५।।** अ. ७

ह्या ओवीमध्ये चार मुद्दे आले आहेत. अर्थात ही ज्ञानोबारायांची युक्ती आहे. अर्जुनाचा प्रश्न, सर्वज्ञ श्रीहरीचे बोलणे आणि संजयाची आवड. मी तुम्हाला सागतो, असे ज्ञानोबाराय इथे म्हणतात. नवव्या अध्यायात संजयाची मर्यादा दिसते. तो धृतराष्ट्राशी मर्यादा ठेवून बोलतो.

**तेथ संजयें माथा तुकिला। अहा अमृताचा पाऊस वर्षला।**
**की हा एथ असतुचि गेला। सेजिया गांवा।।५२३।।** अ. ९

हा धृतराष्ट्र इथे असून दूर गेल्यासारखा वाटतोय म्हणून संजयाने त्याच्यापुढे सांगून माथाच ठेवला. या धृतराष्ट्राला काय सांगावे?

**तरी दातारू हा आमुचा। म्हणोनी हे बोलता मैळेल वाचा।**
**काई झाले ययाचा। स्वभावोचि ऐसा।।५२४।।** अ. ९

असे संजय मर्यादेने धृतराष्ट्राबद्दल बोलतोय कारण काहीही झाले

तरी तो माझा दाता आहे. त्याच्या अशा बोलण्याने माझी वाचा अशुद्ध होईल. नवव्या अध्यायामध्ये एकूण सात ओव्या संजयाचे वर्णन करणाऱ्या आहेत. संजयाचे वर्णन करताना ज्ञानोबाराय इतके समरस झाले आहेत की, त्यांनी इतर सगळ्या गोष्टी बाजूला ठेवल्या. खरे तर ज्ञानोबाराय गीता सांगायला बसले आहेत. आता गीता म्हटली की, भगवान श्रीकृष्ण, अर्जुन, व्यास, धृतराष्ट्र इ. व्यक्तिरेखा त्यात आल्याच, परंतु संजयाचे वर्णन करताना त्यांनी या सर्व व्यक्तिमत्त्वांना बाजूला ठेवले आणि संजयाचे भरभरून वर्णन केले. संजय म्हणतो,

**येतुलें हें वाडे सायासें। जंव बोलत असे दृढेमानसें।**
**तंव न धरवेचि आपुलिया ऐसें । सात्त्विकें केलें।।५२६।।** अ. ९

या ठिकाणी संजय सांगता-सांगता इतका अंतर्मुख झाला की, त्याचा सात्त्विक भाव त्याला आकळता आला नाही. तो विदेही अवस्थेमध्ये पोहोचला. परंतु त्याच्याकडे व्यासांचे लक्ष होते. त्यांना माहीत होते की, त्यांनी संजयाला सांगण्यासाठी बसवले होते, विदेही अवस्थेत जाण्यासाठी नाही. कारण अशी माणसे आपले काम चोख करू शकत नाहीत. पुढे ज्ञानोबाराय म्हणतात,

**चित्त चाकाटलें आटु घेत। वाचा पांगुळली जेथिंची तेथ ।**
**आपादकंचुकित। रोमांच आले।।५२७।।** अ. ९

**अर्धोन्मीलित डोळे। वर्षताति आनंदजळें।**
**आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरी कापे।।५२८।।** अ. ९

**ऐसा महासुखाचेनि आतिरसें। जेथ आटणी होईल जीवदशे।**
**तेथें निरोपिलें व्यासें। तें नेदीच हों।।५३०।।** अ. ९

ह्या चार ओव्या वृत्तीला, एकाग्रतेला अतिशय पोषक आहेत. संजयाची वाचाच बंद झाली, पुढचे त्याला बोलता येईना. हे

अष्टसात्त्विक भावाचे एक लक्षण आहे. व्यासांनी विचार केला की, जर हा बोलायचा बंद झाला तर गीता लिहायचीसुद्धा बंद करावे लागेल. हे अष्टसात्त्विक भाव इथे चालणार नाहीत. संजयाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. डोळे अर्धे झाकलेले अर्धे उघडे राहिले होते आणि त्यातून आनंदाश्रूंचा वर्षाव चालू झाला. या अवस्थेला फार महत्त्व आहे. म्हणून ज्ञानोबारायांनी इतर सगळ्यांना बाजूला ठेवून त्याच्या अवस्थेचे पूर्ण वर्णन केले. ही होणारी अवस्था हे सर्व भक्तांचे आणि मुमुक्षूचे अंतिम साध्य असल्याने, ज्ञानोबाराय ह्या अवस्थेचे वर्णन करताना समरस होतात. तेव्हा अशा अवस्थेमध्ये जाणे संजयाने थांबवले पाहिजे, म्हणजे निवृत्तीकडे गेलेल्या संजयाला पुन्हा वृत्तीवर आणावे लागले. खरे, तर व्यासांचे सगळे ग्रंथ निवृत्तीसाठी असूनही इथे स्वतः व्यासच संजयाला वृत्तीवर येण्यासाठी प्रवृत्त करत आहेत. तेव्हा संजय पुन्हा वृत्तीवर आला. संजयाने सुस्कारा सोडला, आणि तो पुढे म्हणाला,



**तेव्हां नेत्रींचे जळ विसर्जी। सर्वांगींचा स्वेदु परिमार्जी।**
**तेवींचि अवधारा म्हणे होजी। धृतराष्ट्रातें।।५३२।।** अ. ९

डोळे पुसले, अंगाचा घाम पुसला आणि तो म्हणाला, हो जी, ह्यातील 'हो' हा शब्द फार सुंदर आहे. तो ज्ञानोबारायांनी व्यासांकरता घातला आहे. म्हणजे संजय व्यासांना म्हणतो की, 'हो' मी हे सांगणे चालू ठेवतो आहे. संजय पुन्हा बोलू लागला आहे. पुढे नवव्या अध्यायामध्ये ज्ञानोबाराय सांगतात,

**आतां कृष्णवाक्यबीजा निवाडु ।**
**आणि संजय सात्त्विकाचा बिवडु ।**
**म्हणौनि श्रोतयां होईल सुरवाडु । प्रमेय पिकाचा।।५३३।।** अ. ९

**अहो अळुमाळ अवधान देयावें।**
**येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें।**
**बाप श्रवणेंद्रिया दैवें। घातली माळ।।५३४।।** अ. ९

अशा प्रकारे पुन्हा वृत्तीवर येऊन संजय गीतेचे प्रतिपादन करू लागला. दहाव्या अध्यायामध्ये संजयाने आपले दुःख व्यक्त केलेले आहे.

**संजय दुःखावलेनि अंतःकरणे। नवल ना हे दैव दवडणे।**
**हा जीवे धाडसा मी म्हणे। तव आतुही आंधळा।।**

काय करावे ह्या धृतराष्ट्राला? दैव ह्याच्याकडे चालून आले, पण हा मात्र ते दवडतोय. मला वाटत होते, ह्याला बाहेरून दिसत नाही, पण अंतर्चक्षू तरी असतील. पण ह्याला अंतर्चक्षूसुद्धा नाहीत. तेव्हा धृतराष्ट्र बाहेरून आंधळा आणि आतूनही आंधळा ठरला आहे. म्हणजेच सांसारिक अर्थात जगाच्या दृष्टीनेही आंधळा आणि पारमार्थिक दृष्टीनेही आंधळा आहे.

ज्ञानोबाराय म्हणतात, संजय तरी हे सर्व धृतराष्ट्राला सांगायला का तयार झाला; खरे कारण असे आहे की सांगणाऱ्याला एकदा सांगायचे व्यसन लागले की, समोरचा श्रोता ऐकण्याच्या मनःस्थितीत असो वा नसो, सांगणारा सांगत राहतो. ज्ञानोबाराय म्हणतात,

**भुलविला हर्षवेगें। म्हणौनि धृतराष्ट्रातें सांगे।**
**एऱ्हवीं नव्हे तयाजोगें । हें कीर जाणे।।१५८६।।** अ. १७

थोडक्यात, गीता ऐकून संजयाला जो आनंद झाला, तो कुणापुढे तरी व्यक्त केल्याशिवाय त्याला राहवले नाही. म्हणून ऐकण्याच्या मनःस्थितीत नसलेल्या धृतराष्ट्रालाही तो सांगत राहिला. सांगताना त्याने धृतराष्ट्र अनधिकारी आहे, हे पाहिले नाही. आता संजय बदलला आहे. थोडा प्रौढ झाला आहे. अठराव्या अध्यायाच्या ओव्यांमध्ये संजय म्हणतो की, श्रीकृष्ण आणि अर्जुन या दोघांमध्ये जो संवाद चालू आहे त्यात मला असे वाटू लागले आहे की, त्यांच्यामध्ये भेद शिल्लक राहिलाच नाही. पण भेदच राहिला नाही तर संवाद कसा होईल? म्हणून एक ओवी अशी आहे, देव आणि भक्तांमध्ये जरी भेद नसला तरी सांगणारा आणि ऐकणारा कुणीतरी पाहिजे म्हणून तेवढ्यापुरता भेद आहे, असे नाटक करावे लागले याविषयी पुढे संजय म्हणतो की, भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचे लग्न लागले.

**ऐसें संवादाचिया बहुलां। लग्न दोघांचिया आंतुला।**
**लागलें देखोनि जाला। निर्भरु संजयो।।१५७८।।** अ. १८

परंतु हे लग्न फार वेगळ्या प्रकारचे आहे. भगवान म्हणतात,

**तू वालभा मी कांतु। ऐसा पढीये।।**

'तू पती आणि मी पत्नी, एवढा अर्जुना, तू मला आवडतोस'

इतके भक्तांबद्दल देवाला प्रेम वाटत होते. भगवान श्रीकृष्ण, अर्जुन आणि गीता असा हा त्रिवेणीसंगम आहे.

**आधींचि विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी।**
**आणि भक्तराजु किरीटी। परिसत असें।।२।।** अ. ४

सहाव्या अध्यायात संजय धृतराष्ट्राला म्हणतोय की,

### अहंकाराचा त्याग :

**सहजें ब्रह्मरसाचें पारणें । केलें अर्जुनालागीं नारायणें ।**
**कीं तेचि अवसरी पाहुणे । पातलों आम्ही।।२।।** अ. ६

अर्जुनासाठी ही मेजवानी आहे आणि आपण पाहुणे आहोत. म्हणून आपल्यालाही त्याचा लाभ मिळतोय. या त्रिवेणीसंगमात संजयाने काय दान केले त्याबद्दल ज्ञानोबाराय म्हणतात,

**ऐसा श्रीकृष्णार्जुन । संवादसंगमीं स्नान।**
**करूनि देतसे तिळदान । अहंतेचें।।१६१९।।** अ. १८

अहंकार दान करून टाकला, पण त्याच्या संगतीत राहूनही धृतराष्ट्राने काही अहंकार दान केला नाही. संजयाप्रमाणे आपणही जे व्यर्थ मी-मी करतो, त्याचे दान देऊन टाका. संजयाचे बोलणे ऐकत असताना धृतराष्ट्र म्हणाला, तुझी बडबड मी केव्हापासून ऐकतो आहे. पण संजया, माझा प्रश्न असा आहे की, आमचे सैन्य मोठे आहे. माझ्या दुर्योधनाचे कर्तृत्व मोठे आहे. तेव्हा मला एवढेच सांग की, विजय कोणाचा होणार आहे. मला तर वाटते की, आमचाच म्हणजेच कौरवांचाच विजय होणार आहे. याबद्दल तुझे भविष्य सांग. धृतराष्ट्र म्हणतो, **'माझी अवसरी ते फेडी। सांगे विजयाची गुढी।।'**

तेव्हा संजयाने 'ठरवून टाकले की, आता खरे ते सांगून टाकायचे.' ज्ञानोबाराय एकाच ओवीने संपूर्ण गीतेचे वर्णन करतात,

**तैसें शब्दब्रह्म अनंत । जालें सव्वालक्ष भारत।**
**भारताचें शतें सात । सर्वस्व गीता।।१६६१।।** अ. १८

संजय म्हणतो, महाराज, मी सांगतो कोणाचा विजय होईल ते. अहो 'चंद्र तेथे चंद्रिका। शंभू तेथे अंबिका।' हे काय सांगावयास हवे का? आयुष्य म्हणजे जगणे आलेच हे वेगळे सांगायला नको आणि जिथे संत आहेत तिथे विवेक असणारच.

**'गुरु तेथ ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन। दर्शनीं समाधान।**
**आथी जैसें।।१६३६।।** अ. १८

हे सगळे सांगताना धृतराष्ट्राला उत्सुकता लागलीय ती विजय कोणाचा होणार याची. संजय म्हणतो, 'जिथे अर्जुन आहे, तिथे भगवान कृष्ण परमात्मा आहे.

आणि जिथे भगवान आहेत तिथे लक्ष्मी असणारच. आणि जिथे लक्ष्मी आहे तिथे अष्टमहासिद्धी असणारच. विजय नाव ज्या अर्जुनाचे आहे तो अर्जुन ज्या बाजूला आहे,' हे संजयाचे बोलणे ऐकताना आता कुठे धृतराष्ट्राच्या लक्षात थोडे थोडे येऊ लागले की, विजय कुणाचा होऊ शकतो. संजयाने आता ठरवून टाकले होते की, आता गप्प न बसता खरे काय ते सांगून टाकायचे. संजय म्हणतो की, 'ज्या बाजूला प्रत्यक्ष परमात्मा, लक्ष्मी, अष्टमहासिद्धी आणि विजय नावाचा अर्जुन आहे, त्याच पक्षाचा विजय झाल्याशिवाय राहणार नाही.'

विजयलक्ष्मी त्यालाच माळ घालणार-

**'म्हणौनि जिया बाहीं उभा। तो लक्ष्मीयेचा वल्लभा।**
**तेथ सर्वसिद्धी स्वयंभा। येर नेणों।।१६४७।।** अ. १८

एवढे सांगून संजय पुढे म्हणतो की; यातला एकही शब्द जरी खोटा झाला, तरी मी स्वतःला व्यासांचा शिष्य म्हणवून घेणार नाही.

यावरून असे लक्षात येते की, संजयाने धृतराष्ट्राचे सेवकत्व सोडून व्यासांचे शिष्यत्व स्वीकारले आहे. आपण धृतराष्ट्राचे सेवक आहोत हे विसरून आता आपण फक्त व्यासांचे शिष्य आहोत हे त्याने ठामपणे ठरवले आहे.

**या बोला आन होये। तरी व्यासाचा अंकु न वाहें।**
**ऐसें गाजोनि बाहे। उभिली तेणें।।१६५८।।** अ. १८

## धृतराष्ट्र

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीमध्ये धृतराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू शब्द चित्रित केलेले आहेत. धृतराष्ट्र हा हस्तिनापूरचा राजा आहे. नैसर्गिकरीत्या हा जन्मापासून आंधळा आहे. त्याच्या ठिकाणी योग्य विवेक शक्ती नसल्यामुळे हा विचारानेही अंध आहे. तो फक्त आपल्याच मुलांच्या संबंधित विचार करणारा आहे. तसेच तो आपल्या मुलांच्या दुर्गुणांकडे मुद्दाम दुर्लक्ष करणारा आहे. कौरवांचा पिता आहे, पांडवाचा हा चुलता आहे. अन्यायाने संपूर्ण राष्ट्र आपल्याकडे धरून ठेवण्याची याची प्रवृत्ती असल्यामुळे याला धृतराष्ट्र म्हणतात. हा पुत्रांच्या स्नेहाने, मोहाने अंध झालेला आहे. आपल्या मुलांचा विजय होईल ना, असे पुन्हा पुन्हा आपल्या सेवकाला म्हणजेच संजयला विचारतो. कुरुक्षेत्रावर सुरू असलेल्या युद्धाची वार्ता आणि त्यातही आपल्या मुलांची युद्धातील गतिविधी कशी चालली आहे, हे समजावून घेण्यासाठी तो अतिशय उतावीळ दिसतो. नियमबाह्य आचरण करणाऱ्या आपल्याच मुलांच्या हाती राष्ट्राची सूत्रे मिळाली पाहिजेत, अशी त्याची मुळातून इच्छा आहे. परंतु धर्माचे आचरण करणारे आपल्याच बंधूचे पाच पुत्र म्हणजे पांडव, यांच्या हक्कांच्याकडे दुर्लक्ष करतो. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या गीता

संवादाकडे दुर्लक्ष करतो. धृतराष्ट्राचा सेवक संजय श्रीकृष्ण-अर्जुन यांच्या संवादाकडे धृतराष्ट्राचे लक्ष केंद्रित करू इच्छितो. धृतराष्ट्र रागवून विचारतो, तुला येथे युद्ध वार्ता कथन करण्यासाठी ठेवले आहे गीता संवाद कथन करण्यासाठी नव्हे. मला फक्त माझी मुले युद्धात कोणकोणता पराक्रम करतात, तेवढेच सांग.

**तरी पुत्रस्नेहे मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु।।**
**म्हणे संजया सांगे मातु। कुरुक्षेत्रींची।।८५।।**

**जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझे।**
**गेले असती व्याजें। झुंजाचेनि।।८६।।**

**तरी तिहीं येतुला अवसरीं। काय किजत असे येरयेरीं।**
**तें झडकरी कथन करी। मजप्रती।।८७।।** अ. १

संजय हा धृतराष्ट्राचा निष्ठावंत आणि विचारवंत सेवक आहे. त्याला वाटते, आपल्या मालकाने कुरुक्षेत्रावर चाललेला श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा ज्ञान संवाद ऐकावा. त्यातून त्याचा मोह नाहीसा व्हावा आणि विचाराचे डोळे प्राप्त व्हावेत, यासाठी तो सतत दक्ष आहे. संजयच्या बोलण्याचा कोणताच परिणाम धृतराष्ट्र करून घेत नाही, तेव्हा संजयच्या मनामध्ये आपल्या मालकाविषयी चाललेल्या विचाराचे दर्शन माउलींना झाले. त्याच्या मनात काय चालले आहे हे माउली सांगताना म्हणतात की, पाऊस पडून नदीला पूर आलेला असावा, त्यात अनेक जण वाहत असतानासुद्धा एखादा रेडा त्या पाण्यात निवांत बसून राहतो, परंतु आपण वाहून जाऊ याची खंतही त्याच्या मनात नसते. अगदी हा तसाच धृतराष्ट्र आहे. असे संजयला मनात वाटते.

**अहो ऐकीजतसे की अवधारा। तव इया बोला निवांतचि म्हातारा।**
**जैसा म्हैसा नुठीका पुरा। तैसा उगाचि असे।।** अ. ९

संजय आपल्या मालकाचे म्हणजे धृतराष्ट्राचे सद्‌विचाराकडे दुर्लक्ष होत आहे या विचाराने दुःखी होतो. संजय मनात म्हणतो की हा माझा राजा आतूनही विचाराने आंधळा आणि बाहेर चर्मचक्षूंनी आंधळा आणि असे असतानासुद्धा हा हस्तिनापूरचा सम्राट आहे. याच्या या अशा वागण्यामुळे राष्ट्राचे उत्थान तर नव्हे पण राष्ट्र अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही. आंतर-बाह्य अंध असलेल्या राजाच्या राज्याचे काय होईल हे सांगता येत नाही.

**पैं राया तो पंडुसुतु। ऐसिये प्रतीतीसि जाहला वरैतु।**
**या संजयाचिया बोला निवांतु। धृतराष्ट्र राहे।।३२८।।**

**कीं संजयो दुखवलेनि अंतःकरणें।**
**म्हणतसे नवल नव्हे दैव दवडणें।**
**हा जीवें धाडसा आहे मी म्हणें।**
**तंव आंतुही आंधळा।।३२९।।** अ. १०

एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी दुर्गुण असतात. ते दुर्गुण घालविण्यासाठी तो प्रयत्नही करत नाही. परंतु, सुदैवाने चांगल्या व्यक्तींची संगत आणि त्यांच्या सद्‌विचारांचे वारंवार झालेले श्रवण यांच्यामुळे मोठा सकारात्मक परिणाम घडून येतो. अशीच घटना धृतराष्ट्राच्या जीवनात घडलेली आहे. व्यास कृपा प्राप्त सद्‌विचारी संजय सेवक मिळाला, त्याच्या तोंडून श्रीकृष्ण-अर्जुन यांच्यात झालेला अध्यात्म संवाद पुन्हा पुन्हा ऐकायला मिळाला, याचाच परिणाम शेवटी धृतराष्ट्राच्या मनावर सकारात्मक परिणाम झाला आणि आयुष्याच्या शेवटी का होईना, तो विवेकसंपन्न होऊन सुखी झाला. सुरुवातीस वाटत होते की श्रीकृष्ण उपदेश धृतराष्ट्राने वाया घालवला. परंतु श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, द्राक्षाच्या मुळाशी घातलेले दूध वाया गेले असे जरी सुरुवातीला वाटले तरी दुग्ध प्राप्त द्राक्ष वृक्षाला खूप मोठी फळे येताना दिसतात. त्याचप्रमाणे

धृतराष्ट्राच्या जीवनात गीता श्रवणाचे फळ शेवटी तो सुखी-समाधानी झाल्याने फलद्रूप झाले.

**तें श्रीकृष्णवचनामृत। पार्थीं भरोनि असे वोसंडत।**
**मग व्यासकृपा प्राप्त। संजयासी।।५८८।।**

**तो धृतराष्ट्र राया। सूतसे पान करावया।**
**म्हणौनि जीवितांतु तया। नोहेचि भारी।।५८९।।**

**एऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं। आवडों लागतां अनधिकारी।**
**परि शेखीं तेचि उजरी। पातला भली।।५९०।।**

**जेव्हां द्राक्षीं दूध घातलें। तेव्हां वायां गेलें गमलें।**
**परी फळपाकीं दुणावलें। देखिजे जेवीं।।५९१।।**

**तैसी श्रीहरीवक्त्रींचीं अक्षरें। संजयें सांगितलीं आदरें।**
**तिहीं अंधु तोही अवसरें। सुखिया जाला।।५९२।।** अ. १५